**महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी पदावरील पदव्युत्तर पदवी / पदविका अर्हताधारकास विशेष वेतनवाढी मंजूर करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र. मवैअ-२०११/प्र.क्र.७७६/११/सेवा ३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १९ नोव्हेंबर, २०१२

**संदर्भ :-**

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. मवैअ-२०११/प्र.क्र.७७६ /११/सेवा ३, दि.१४.१२.२०११.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन अधिसूचना क्र.आरटीआर-१०९१/प्र.क्र.२२६ /सेवा-३, दि.३०.१०.२०००.
३) सहसंचालक आरोग्य सेवा, पुणे यांचे क्र.ससंआसे/मवैआसे/प्रोत्साहनपर वेतनवाढी /४६८५-८६/कक्ष-५ २ब/१२, दि.१८.२.२०१२.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० + ग्रेड पे रु.५४००) या पदावर नियुक्ती झाल्यानंतर पदवीका अर्हताधारकास तीन अतिरिक्त वेतनवाढी व पदव्युत्तर पदवी अर्हताधारकास सहा अतिरिक्त वेतनवाढी सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. मवैअ-२०११/प्र.क्र.७७६/११/सेवा ३, दि.१४.१२.२०११ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

२. "कार्यरत विशेषतज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहील किंवा कसे" या बाबत सदर शासन निर्णयाच्या व्याप्ती संदर्भात अधिक स्पष्टीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता, या शासन निर्णयान्वये प्रस्तूत बाब स्पष्ट करण्यात येत आहे की, आरोग्य सेवेतील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-अ (वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० + ग्रेड पे रु.५४००) या संवर्गात दि.१४.१२.२०११ रोजी कार्यरत असलेल्या व त्यानंतर वरीष्ठ पदावर पदोन्नत झालेल्या तसेच अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरीष्ठ पदाची वेतनश्रेणी प्राप्त असलेल्या सार्वजनिक आरोग्य विभाग शासन अधिसूचना क्र.आरटीआर-१०९१/प्र.क्र.२२६/सेवा-३,

दि.३०.१०.२००० मधील नियम ३ (क) खालील परंतूकानूसार सदर पदासाठी आवश्यक किमान शैक्षणिक अर्हतेशिवाय वैद्यक शास्त्रातील (उच्चतर शैक्षणिक अर्हता) संविधिक विद्यापीठाची चिकित्सा विशेषज्ञाची पदव्युत्तर पदवी / पदव्यूत्तर पदविका अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दि.१४.१२.२०११ अनूसार अनुज्ञेय करण्यात आलेल्या प्रोत्साहानात्मक वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहील.

३. तथापि, ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे एका पेक्षा अधिक पदव्युत्तर पदविका धारण करीत असल्यास त्यांना कमाल तीन वेतन वाढी अनुज्ञेय राहतील. तसेच ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे एक पदव्युत्तर पदविका व एक पदव्युत्तर पदवी प्राप्त असल्यास किंवा एका पेक्षा अधिक पदव्युत्तर पदवी असल्यास त्यांना कमाल सहा वेतनवाढी अनुज्ञेय राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (**www.maharashtra.gov.in**) या शासनाच्या संकेत स्थळावर (वेबसाईट) प्रसिध्द करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्र..२०१२११११४११२५३११७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता.मा.कोळेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक आरोग्य सेवा, मुंबई.
सह संचालक (प्रशासन व अर्थसंकल्प), आरोग्य सेवा, मुंबई
उपसंचालक आरोग्य सेवा (सर्व मंडळे)
जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखापरीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१२), मंत्रालय, मुंबई-३२
सार्वजनिक आरोग्य विभाग (कार्यासन सेवा-३ नि.मं.) मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (सेवा-३)

F:/GR